**अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षणाच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक- अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३**
नवीन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- २० ऑगस्ट, २०१९.

**वाचा** :-१.शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का.०३,दि.०२.०४.२०१८.
२.शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग,क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का.०३,दि.०६.०६.२०१६.
३. शासन शुध्दिपत्रक, महिला व बाल विकास विभाग, क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का.०३, दि.०९.०५.२०१८.

**प्रस्तावना :-**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना संस्थेतून बाहेर पडल्यानंतर जातीचा दाखला नसल्यामुळे विविध शासकीय लाभांपासून वंचित रहावे लागते. त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरिता शिक्षण व नोकरी यामध्ये खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण लागू करण्यात आले असून त्यासाठी अटी व शर्ती निश्चित करण्यात आल्या आहेत. तसेच उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ मधील शासन निर्णयातील मुद्दा क्र.८ अन्वये अनाथ आरक्षणाबाबत करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सविस्तर मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील असे नमूद आहे. त्यानुसार अनाथ आरक्षणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**परिपत्रक** :-

अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून देण्यात आलेल्या १% समांतर आरक्षणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) अनाथ मुलांना देण्यात आलेले समांतर आरक्षण फक्त खुल्या प्रवर्गातून देण्यात आलेले असले तरी त्यांना मागासवर्गीयांप्रमाणे वय व फी यामध्ये सवलत देण्यात यावी.
२) अनाथ आरक्षणासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी दाखला (Domicile) सादर करणे आवश्यक राहील.
३) समांतर आरक्षणाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निश्चित केलेले निकष व अटी अनाथ आरक्षणास लागू राहतील.
४) अनाथांसाठी असलेल्या आरक्षणातून सरळसेवेने नेमलेला उमेदवार हा आरक्षण बिंदू नामावलीमध्ये खुल्या प्रवर्गामध्ये गणण्यात येईल.
५) सदर उमेदवार संबंधित पदाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनुसार पदासाठी आवश्यक असणारी किमान शैक्षणिक व इतर अर्हता प्राप्त करणारा असावा.

६) अनाथांसाठी १% आरक्षण असल्यामुळे १०० पदांपैकी १ पद अनाथांसाठी येईल. तथापि, रिक्त पदावर १% नुसार येणारी संख्या जर अपूर्णांकात असेल तर ०.५० पेक्षा कमी येणारा अपूर्णांक दुर्लक्षित करावा व ०.५० किंवा त्यापेक्षा मोठा अपूर्णांक १ समजावा.

७) अ) अनाथ आरक्षणाअंतर्गत पद भरतीसाठी दावा करणाऱ्या उमेदवारांनी सरळसेवेसाठी अर्ज करण्यापूर्वी विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास यांच्याकडून अनाथ प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे व सदर प्रमाणपत्राचा संकेतांक क्रमांक व दिनांक अर्जामध्ये नमूद करणे आवश्यक राहील.

ब) सदर शासन परिपत्रक निर्गमित होण्याच्या दिनांकापूर्वी विविध परीक्षा ज्या टप्प्यांवर आहेत त्या लगतच्या पुढील टप्प्यासाठीही हे परिपत्रक लागू राहील. उदा. जर राज्य सेवा मुख्य परीक्षा पार पडली असेल तर,मुलाखतीच्या पूर्वी सर्व संबंधित पात्र उमेदवारांना अनाथ प्रमाणपत्र सादर करण्याची संधी देऊन त्यानुसार अनाथ प्रमाणपत्र धारण करणारे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरतील. तथापि, ज्या पदभरती प्रक्रियांचे अंतिम निकाल जाहीर झाले आहेत अशा प्रकरणांमध्ये सदर तरतूद लागू राहणार नाही.

८) अनाथ आरक्षण लागू करताना शासन निर्णय दि. ०२.०४.२०१८ मधील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संबंधित प्राधिकरणाची राहील.

२. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१९०८२०१४४५००६८३० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sandhya Sudhir Gawas

Digitally signed by Sandhya Sudhir Gawas
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9af004e92d57921adf37df245e6a4d654bc630fcd0b0e13d1dd766b546c90f61, serialNumber=bfcea34b3e67580078284e564299f1fb5f9606206bcc59992327334b4690771c, cn=Sandhya Sudhir Gawas
Date: 2019.08.20 15:53:51 +05'30'

**( सं. सु. गवस )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा
५) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद
६) सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
७) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
८) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय( विधानसभा)
९) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद)
१०) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
११) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१२) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई
१३) प्रबंधक, उच्च न्यायायल, अपील शाखा, मुंबई

१४) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१५) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण, मुंबई, नागपूर, औरंगाबाद
१६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१७) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
१८) आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे.
१९) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
२०) महालेखापाल, महाराष्ट्र १/२(लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
२१) महालेखापाल, महाराष्ट्र ½(लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर
२२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२३) निवडनस्ती, कार्यासन-०३, महिला व बाल विकास विभाग.